# एका यशस्वी युरोलॉजिस्टची वाटचाल

आत्मचरित्र : डॉ. शरद द. बापट

संकल्पना आणि लेखन
शिल्पा शिवलकर

राजहंस प्रकाशन

विमलसाठी...

# वैद्यकीय व्यावसायिकांसाठी सल्ला

*ज्याला एकाच शाखेचे ज्ञान आहे,*
*तो एकच पंख असलेल्या पक्ष्यासमान आहे.*
*मात्र ज्याला ज्ञानाची सांगड अनुभवाशी घालता येते,*
*तो दोन चाकांवर तोललेल्या रथाप्रमाणे*
*खात्रीपूर्वक आणि आत्मविश्वासाने वाटचाल करतो.*

सुश्रुत

# डॉक्टरांसाठी प्रार्थना

ज्या गोष्टी खरेतर निसर्गावर सोडून देणे श्रेयस्कर
त्यात अनावश्यक हस्तक्षेप करून
त्या बिघडवून ठेवणे;

नव्या तंत्राचा अनाठायी वापर
आणि जुन्या अनुभवसिद्ध पद्धतींबद्दलची अनास्था,

विद्येपेक्षा पांडित्याची मिरासदारी
कलेसमोर शास्त्राला अति महत्त्व
आणि विवेक सोडून हुशारीचे प्रदर्शन,

आपल्याकडे आलेल्या रुग्णाकडे
केवळ एक केस फाईल म्हणून बघणे;
रोग परवडला म्हणावे
इतका त्याचा उपचार त्रासदायक करून ठेवणे;

या सर्व दोषांपासून, हे परमेश्वरा, तू आमचे रक्षण कर.

सर रॉबर्ट हचिन्सन

(मूळ इंग्रजी उताऱ्यावरून रूपांतरित)

# मनोगत

साधारण आठ वर्षांपूर्वी एक युरोलॉजिस्ट डॉक्टर म्हणून आपल्या अनुभवांबद्दल लिहायचे मी ठरवले, त्या वेळी विमल मला अधून-मधून आठवण करून देत असे की तू लिहिणार आहेस ना? पुढे तिच्या ते लक्षातून गेले. विमल मेडिकलला माझ्या वर्गात होती. एकत्र शिकल्याचा आणि एकत्र काम केल्याचा सगळ्यात घट्ट असा धागा आमच्यात होता. ती वयाने माझ्याएवढीच होती, पण कोविडनंतरच्या काळात तिची स्मरणशक्ती पूर्ण गेली.

१९६४पासून मी अधून-मधून डायरी लिहायला लागलो. तेव्हापासूनच्या डायऱ्या माझ्यापाशी आहेत. ७७नंतर त्यात पुष्कळ नियमितपणा आला. त्या वेळी कामात गुंतलेल्या आयुष्यात असा स्वत:शीच संवाद आवश्यक वाटत असे. तेव्हापासून सतत स्वत:ला तपासून बघण्याची सवयच लागली. माझे वडील दत्तात्रय विष्णू बापट (अण्णा) विमा कंपनीत अधिकारी पदावर होते. त्यांच्या निरनिराळ्या शहरांत बदल्या होत. आम्ही फाळणीच्या आधी लाहोरमध्ये राहायला होतो. तेथे शिक्षण हिंदीमधून होते. नंतर अहमदाबाद येथे गुजरात कॉलेजात इंटरपर्यंतचे शिक्षण झाले. या सगळ्या स्थलांतरात मराठी मागे पडली. त्यानंतरच्या काळात केलेले लेखन इंग्रजीतूनच अधिक झाले.

त्यामुळे साहजिक या आठवणी आधी इंग्रजीत प्रसिद्ध झाल्या. डिंपल प्रकाशनाने काढलेल्या या इंग्रजी आवृत्तीला समव्यावसायिक, मित्र, आप्तेष्ट आणि वैद्यकीय क्षेत्राशी संबंध नसलेल्या वाचकांकडूनही चांगला प्रतिसाद मिळाला. विमल या प्रकाशन समारंभाच्या वेळी हजर राहण्याच्या स्थितीत नव्हती. तिची तब्येत त्यादरम्यान खूपच खालावत गेली होती. सदैव हसतमुख असणे हे विमलचे वैशिष्ट्य होते आणि तेवढ्या त्रासातही तिचे हसू टिकून राहिले होते. चार वर्षांची मेडिकल कॉलेजातील मैत्री आणि साडेसहासष्ट वर्षांच्या आमच्या संसारानंतर विमलच्या मृत्यूने मी हळवा झालो. अलीकडे जुन्या डायऱ्या काढून पुन्हा वाचतो.

आमच्या घर-संसाराला सुरुवात झाली त्या काळात स्त्रियांच्या वाट्याला श्रेय आणि कौतुक कमीच येई. विमल स्वत: डॉक्टर होती आणि तिची योग्यता मोठी होती. असे असूनही तिने आपल्याकडे एक प्रकारे दुय्यमपणाची भूमिका स्वीकारली. विमलच्या हुशारीची मला सदैव जाणीव होती. मात्र तिला योग्य

ते महत्त्व मिळायला हवे म्हणून माझ्याकडून मी जितके करायला हवे होते, ते करण्यात कमी पडलो असे आता वाटते. विमलचे मराठी छानच होते. मराठी पुस्तक प्रसिद्ध होताना ती केवळ सोबत असती, तरी त्यात आनंद होता; परंतु विमल नाही, तेव्हा विमलच्या अनंत आठवणींना मी ते समर्पित करतो.

इंग्रजी पुस्तक झाल्यानंतर हे आत्मचरित्रपर पुस्तक मराठीत यावे असा विचार सुरू झाला. पण दरम्यानच्या काळात पत्नी विमल हिच्या निधनामुळे माझ्यात तितिकीशी मानसिक शक्ती राहिली नव्हती. इंग्रजी पुस्तकाचे संपादन शिल्पा शिवलकर यांनी जाणकारीने केले होते. त्यापेक्षा मराठी पुस्तक पूर्णपणे वेगळे वा स्वतंत्र असावे अशी कल्पना त्यांनी मांडली.

तेव्हापासून आठवड्यातून एकदा दर बुधवारी त्या माझ्याकडे याबाबत चर्चेसाठी येऊ लागल्या. अनेक अनुभवांबद्दल आम्ही मोकळेपणाने आणि सविस्तर बोललो. माझे वडील दत्तात्रय विष्णू बापट यांनी त्यांच्या आठवणी लिहिल्या होत्या हे कळल्यावर, त्यांनी ती डायरी वाचून काढली व तिचे मूल्य जाणून त्यांनी तिचा समावेश या पुस्तकात केला. त्यामुळेच संकल्पना व लेखन असे खास श्रेय त्यांना दिले आहे. त्या नसत्या तर कदाचित हे पुस्तक झाले नसते एवढेच येथे सांगतो.

त्याचबरोबर प्रशांत दीक्षित यांनी हे पुस्तक 'राजहंस'करता सुचवले आणि दिलीपराव माजगावकरांनी आस्थेने ते प्रकाशनासाठी स्वीकारले. या दोघांचा, तसेच पुस्तकाला देखणे रूप देणाऱ्या सर्व 'राजहंस'च्या परिवाराचा मी मनापासून ऋणी आहे.

**डॉ. शरद द. बापट**

# प्रास्ताविक

डॉ. शरद बापटांचा जन्म १९३२चा. ते किंवा डॉ. यशवंत आमडेकर (बालरोगतज्ज्ञ) किंवा डॉ. प्रेमानंद रामाणी (न्यूरो स्पायनल सर्जन) या त्यांच्या पिढीच्या डॉक्टरांच्या जगण्यात मला कमालीची स्पष्टता व एकसंधपणा दिसतो. स्वच्छ जीवनदृष्टी, निश्चित ध्येय आणि एखाद्या व्रतासारखा निष्ठेने केलेला प्रवास. एक प्रकारे त्यांची आयुष्ये मला क्लासिक वाटतात. डॉ. बापटांच्या पुस्तकावर काम करावेसे वाटले, त्याचे हे मुख्य कारण.

अनेकदा एका पिढीतल्यांचे यश हे त्यांच्या आधीच्यांच्या कष्टांवर उभे असते. या पुस्तकात असाच तीन पिढ्यांचा आलेख पाहायला मिळतो. डॉ. शरद बापटांच्या वडिलांनी म्हणजे दत्तात्रय विष्णू बापट यांनी एका घरगुती डायरीत आपल्या आठवणी लिहून ठेवलेल्या होत्या. त्यात १९०२पासून सुरुवात करून १९४५पर्यंतची हकिकत येते. ते त्या काळाचे विश्वासार्ह डॉक्युमेंटेशन आहे. निवेदनाची शैली जुन्या वळणाची आणि सुरेख आहे.

शरद बापट डॉक्टर झाल्यामुळे त्यांना यशही ठळक मिळाले. परंतु बापटांचे वडील हेही तितकेच बुद्धिमान आणि महत्त्वाकांक्षी होते. ते दोन वेळा आय.सी.एस.ला बसले होते. गणितात एमए होते. ॲक्च्युरीयनच्या पाच परीक्षा दिलेल्या होत्या. आयुष्यात मोठी उडी घेण्याच्या त्यांच्या अनेक संधी हुकल्या. तरीही त्यांची वृत्ती कमालीची समतोल व आनंदी होती. डॉक्टरांचे व्यक्तिमत्त्व घडण्यात त्यांचा मोठा वाटा आहे.

तेव्हाचा मराठी मध्यमवर्ग हा कसा हिंदुस्थानभर अनेक दिशांनी फिरणारा होता, याची एक झलक वडिलांच्या हकिकतीतून पाहायला मिळते. वडील अण्णासाहेब चिरमुल्यांच्या विमा कंपनीचे शाखाप्रमुख म्हणून लाहोरला होते. हिंदूंना त्या वेळी लाहोर परके वाटत नव्हते. १९४५ ते ४७ अशा महत्त्वाच्या काळात बापट मंडळी लाहोरला होती. डॉक्टरांच्या आठवणीतले तेव्हाचे लाहोर हे परिकथेतल्यासारखे सुंदर आहे. त्यावरून लक्षात येते की, फाळणीची राजकीय रेघ उमटेपावेतोचे लाहोर हे शांतपणे नांदणारे एक हिंदुस्थानी शहर होते.

यश कधीही गृहीत धरायचे नाही, असा एक धडा डॉक्टरांना अगदी सुरुवातीलाच मिळाला. हुशार होते. तरीही मॅट्रिक परीक्षेत साधारण गुण मिळाले. त्यामुळे त्यांचा आत्मविश्वास कमी झाला. पुढे इंटरला मुंबई विद्यापीठाचे गिब्ज

पारितोषिक, मेडिकलला कायम प्रथम असे प्रचंड शैक्षणिक यश मिळाले. पण त्या सुरुवातीच्या फटक्याचा परिणाम दीर्घकाळ राहिला. पाय कायम जमिनीवर राहिले.

पण यामुळेच कदाचित, आपल्या क्षमता काय आहेत व काय करायचे आहे याबाबत अगदी तरुण वयापासून कमालीची स्पष्टता त्यांच्यात आली असावी. त्या काळात इंग्लंडला जायचे ते एफआरसीएस करायला असा शिरस्ता होता. पण तिथे चार वर्षे राहूनही बापटांनी ती परीक्षा दिली नाही. कारण, तेव्हा इंग्लंडमध्येदेखील युरोलॉजीमध्ये एफआरसीएस करण्याची सोय नव्हती. बापटांचे म्हणणे एकदम स्पष्ट होते. आपल्याला युरोलॉजी शिकायची आहे, पदवीशी कर्तव्य नाही. त्यानुसार, युरोलॉजीचे आवश्यक ते प्रशिक्षण व अनुभव घेऊन ते भारतात परतले आणि इथे या शाखेचा पाया घालण्यात पुढाकार घेतला. युरोलॉजीचा विभाग, अभ्यासक्रम आणि पदवी त्यांच्यासारख्यांनी सुरू केली. ते या क्षेत्रातले पायोनियर ठरले.

आपल्या कामावरची असाधारण श्रद्धा हे त्यांच्या पिढीतल्या अनेकांचे ठळक वैशिष्ट्य डॉक्टरांमध्येही आपल्याला दिसते. युरोलॉजीची शाखा ओपन ऑपरेशनपासून पूर्णत: एंडोस्कोपी आणि नंतर रोबोटिक कॉन्सोल सर्जरीपर्यंत उत्क्रांत होत गेली. बापट व त्यांची पिढी डॉक्टर झाली ती क्लासिकल ओपन सर्जरीची तंत्रे घोटवून. पण त्यांच्या काळात युरोलॉजी वेगाने बदलत होती. हे पुढचे बदल त्यांनी हिरिरीने आत्मसात केले. त्यासाठी जागतिक स्तरावरील युरोलॉजिस्टांच्या सर्व संघटनांवर ते सक्रियपणे वावरले.

आंतरराष्ट्रीय स्तरावरचा डॉ. बापटांचा वावर हा एक स्वतंत्र अध्याय आहे. भारतीय समव्यावसायिकांना कमी लेखण्याची जी पाश्चिमात्यांची प्रवृत्ती दिसून येते, त्याबाबत अतिशय ठाम भूमिका घेऊन त्यांनी समांतरपणे भारतात युरोलॉजीची पहिली आंतरराष्ट्रीय परिषद भरवली. तिचे यश इतके ठळक होते की, त्यामुळे भारतीय युरोलॉजीच्या ताकदीचा डंका जगभर वाजला.

त्या काळातला मुंबईतल्या वैद्यकीय व्यवसायाचा परिसर डॉक्टरांच्या व्यक्तिमत्त्वाला पोषक ठरला. त्यांना सहकारीही तसेच तोला-मोलाचे लाभले. निष्णात ॲनास्थेटिस्ट डॉ. बळवंत घारपुरे, कलावंत वृत्तीचा सर्जन डॉ. वल्लभ पटेल अशी सुंदर, अविस्मरणीय व्यक्तिचित्रे, केईएम आणि सायन या सार्वजनिक आरोग्य संस्थांमधील वातावरण, त्यांच्या पिढीतील डॉक्टरांचा क्लिनिकल तपासणीवरचा भर - अशा अनेक गोष्टी या निवेदनाचा महत्त्वाचा भाग म्हणून येतात.

मला आणखी एक गोष्ट महत्त्वाची वाटते, ती म्हणजे डॉ. शरद बापटांचे स्त्रियांशी असणारे सहकार्याचे नाते. बुद्धिमान आई, कर्तबगार आत्या, बरोबरीच्या बहिणी, समर्थपणे साथ देणारी पत्नी, त्यांच्या चार हुशार मुली, जिच्याशी आजही घरगुती नाते टिकून आहे ती इंग्लंडमधील मैत्रीण. या सर्व स्त्रियांमुळे आपले आयुष्य सुंदर झाले, असे त्यांना वाटते. त्यांच्याविषयीचा आदर आणि कृतज्ञता या दोन्ही गोष्टी बापटांच्या कथनात जाणवतात.

सरतेशेवटी आयुष्याकडे वळून पाहताना समारोपात ते म्हणतात की, मिळालेले यश उपभोगण्याचा स्वभाव नव्हता. स्वत:कडून कायम खूप अपेक्षा केल्या आणि हरएक गोष्टीसाठी स्वत:ला जबाबदार धरले. मिळवलेले यश ही तर एव्हाना जुनी गोष्ट झाली. वयाच्या ९३व्या वर्षी अशा निर्मळ मनाने संवाद साधणारे डॉ. बापट आपल्याला जवळचे वाटतात.

## पुस्तक असे घडले

डॉ. बापटांनी लिहिलेल्या इंग्रजी पुस्तकाचे संपादन करताना त्यात अनेक शक्यता असल्याचे जाणवले होते. त्यामुळे मराठीत ते पूर्णपणे नव्याने व वेगळ्या रितीने लिहावे लागेल, हे आरंभापासून स्पष्ट होते. केवळ डॉ. बापटांचे काम व आठवणी असे त्याचे स्वरूप न ठेवता युरोलॉजीच्या वाटचालीचा एक समग्र आढावा या निमित्ताने घ्यावा, असा मुख्य दृष्टिकोन होता.

त्यासाठी गेले वर्षभर आम्ही दर आठवड्याला भेटत होतो. त्यातून काही मुद्द्यांचा विस्तार केला. तर नेफ्रोलॉजीची शाखा, डायलिसिस आणि मूत्रपिंड आरोपणाच्या शस्त्रक्रियेविषयीची त्यांची निरीक्षणे अशासारखे पुष्कळ नवे विषय त्यात समाविष्ट झाले. यामध्ये 'युरोलॉजिकल सोसायटी ऑफ इंडिया'चा जो इतिहास नोंदलेला आहे, त्यासाठी मुख्यत: बापटांचे शिक्षक डॉ. दारा करंजावाला यांच्या 'मेमॉयर्स' या पुस्तकातील, त्याचप्रमाणे 'इंडियन जर्नल ऑफ युरोलॉजी'मध्ये डॉ. एच. एस. भट यांच्यावर लिहिलेल्या डॉ. गणेश गोपालकृष्णन यांच्या लेखातील संदर्भ उपयोगी पडले.

युरोलॉजीमधील अनेक तांत्रिक शब्दांच्या बाबतीत इंग्रजीला मराठी प्रतिशब्द न देता, प्रत्येक ठिकाणी संकल्पना मुळातून समजावून सांगितल्या आहेत. त्यासाठी बापटांनी आकृत्या काढून अनेक गोष्टी माझ्याकरता म्हणून समजावून दिल्या. ते उत्तम शिक्षक आहेतच. काही वेळा हॉस्पिटलमधून जुनी-नवी एंडोस्कोपीची उपकरणे मुद्दाम मागवून घेऊन मला दाखवली. पूर्णपणे समजून घेतल्याखेरीज यातील एकही वाक्य लिहिलेले नाही आणि प्रत्येक

टप्प्यावर त्यांना ते वाचून दाखवून, जास्तीत जास्त तासून मांडलेले आहे.

या पुस्तकाचे काम चालू असल्याबद्दल प्रशांत दीक्षित यांच्याशी बोलताना उल्लेख झाला होता. 'साप्ताहिक सकाळ'साठी मुंबईच्या कार्यालयात काम करीत असल्यापासूनचे ते जुने सहकारी आणि मित्र. त्यांनी या पुस्तकात रस घेतला आणि केवळ त्यांच्यामुळेच 'राजहंस' प्रकाशनाच्या दिलीपराव माजगावकरांपर्यंत हे पुस्तक पोचू शकले. त्यांनीही लगोलग अनुकूल अभिप्राय दिला आणि 'राजहंस'तर्फे हे पुस्तक प्रकाशित करीत असल्याचे कळवले. या दोघांचेही मनापासून आभार.

त्याचबरोबर पुस्तकाच्या निर्मितीमध्ये सहभागी असलेले 'राजहंस'चे डॉ. सदानंद बोरसे, निर्मितिप्रमुख शिरीष शेवाळकर, मुग्धा दांडेकर, गौरी भावे, तृप्ती देशपांडे, सारिका भामे, वैशाली जोशी, शर्मिली जोशी, संजय जोशी, भरत मोतीवाले आणि संपूर्ण 'राजहंसी' टीमचेदेखील आभार.

डॉ. बापट यांच्या 'अ युरोलॉजिस्ट्स जर्नी' या पुस्तकाचे मुखपृष्ठ अस्मा मांद्रेकर यांनी केले होते. एक युरोलॉजिस्ट सिस्टोस्कोपमधून बघत मूत्रपिंडांच्या वाटेतून आपल्या पाऊलखुणा उमटवत चालला आहे, असा त्याचा आशय आहे. डॉ. बापटांना ते विशेष आवडले होते. त्यामुळे त्यांच्या आग्रहास्तव तेच चित्र या पुस्तकासाठीही वापरले आहे. ते वापरण्याची परवानगी दिल्याबद्दल अस्मा, तसेच डिंपल प्रकाशनाचे आभार.

डॉ. बापटांच्या आयुष्यातील सर्व स्त्रियांशी त्यांची सहज आणि बरोबरीच्या नात्याने मैत्री होते, तशी आमचीही झाली. हा या सर्व कामातील आनंदाचा भाग.

**शिल्पा शिवलकर**

## अनुक्रम

**भाग एक : मला डॉक्टर व्हायचे होते**

एक आठवते तसे / ३

दोन अण्णांची गोष्ट / १३

तीन बाळपणीचा काळ सुखाचा / ३०

चार लाहोरच्या प्रेमात / ३७

पाच अस्थिर कालखंड / ५१

सहा करिअरची निवड / ५६

सात मेडिकलची वर्षे / ६१

आठ सर्जरीच्या प्रांतात / ७३

नऊ युरोलॉजीची दिशा / ८४

**भाग दोन : युरोलॉजिस्ट म्हणून वाटचाल**

दहा इंग्लंडमधील अनुभव / ९३

अकरा फ्रेशमन यांच्या शाळेतील धडे / १०५

बारा कार्यसिद्धी आणि परतीचा निर्णय / ११८

तेरा सुरुवातीचा संघर्ष / १२८

चौदा सायन हॉस्पिटलच्या युरोलॉजी विभागाची पायाभरणी / १४९

पंधरा एंडोस्कोपिक क्लिनिक आणि हॉस्पिटल (इ.के.एच.) / १५९

सोळा क्लिनिकल तपासणीचे महत्त्व / १८७

सतरा पेशंटशी संवादाची कला / १९८



**भाग तीन : वाटचालीतील सोबती**

अठरा घरातील कर्तबगार स्त्रिया / २११

एकोणीस आयुष्यभराचे सहकारी / २२३

**भाग चार : शैक्षणिक आणि संस्थात्मक कार्य**

वीस शिकवण्यातील आनंद आणि नडियाद / २३७

एकवीस राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील युरोलॉजी / २५१

□ समारोप / २६५

भाग एक

# मला डॉक्टर व्हायचे होते



एक

# आठवते तसे

आत्मचरित्र लिहिण्याइतका मी कोणी महापुरुष नाही; पण अनेकदा वाटले की आपल्या आयुष्याचा जर इतर कोणाला उपयोग झाला, तर ते आयुष्य सत्कारणी लागल्यासारखे होईल. माझा प्रवास त्या काळातील चाकोरीपेक्षा थोड्या निराळ्या वाटांवरून झाला. त्यात विविध प्रकारचे अनुभव जमा होत गेले. त्यामुळे ते लिहून काढावेत असे अनेकदा वाटले. ज्यांना मी माझ्या आयुष्यातील घडामोडींची हकिकत सांगितली त्यांना ती खूप वेगळी वाटली व त्यांनीही मला हे सर्व लिहून काढण्यास सुचविले.

माझी धाकटी मावसबहीण राणी देव (माहेरची जयश्री बोडस) हिने तर मला इतक्या वेळा याबद्दल आठवण करून दिली की हे पुस्तक लिहून झाले यात तिचाही वाटा आहे. याप्रमाणेच श्री. पंडितराव हे माझे चांगले मित्र आणि खादी ग्रामोद्योगमधील एकेकाळचे मोठे अधिकारी. त्यांना माझ्या गोष्टी फारच रंजक वाटायच्या, विशेष करून माझ्या लाहोरमधल्या आठवणी. मी लिहावे म्हणून त्यांनीदेखील अगदी आग्रह धरला होता. कधीही भेटले की मी लिहायला सुरुवात केली की नाही याबद्दल आधी विचारायचे. त्यामुळे त्यांचेही स्मरण करणे आवश्यक आहे.

शालू आणि मालू या माझ्या दोघी बहिणीपण मला आमच्या पूर्वीच्या दिवसांतील निरनिराळ्या हकिकती लिहिण्याबद्दल सारख्या सांगत. या सर्व आप्तस्वकीयांनी दाखविलेल्या उत्साहामुळे माझा लिहिण्याचा हुरूप वाढला एवढे नक्की सांगता येईल. असो. ही प्रस्तावना पुरे.

माझे लहानपण केव्हापासून चालू करावे याचा मला प्रश्न पडतो. पण एक मात्र नक्की, अगदी लहानपणापासूनच शरद डॉक्टर होणार असे अनेकदा माझ्या कानावर आले. आमच्या मोठ्या कुटुंबात केव्हाही कोणीतरी आजारी

असायचेच. कदाचित त्यामुळे असेल; पण घरातला कोणी डॉक्टर झाला तर किती छान होईल असे वाटल्यास नवल नाही. मीदेखील मुलांच्यात खेळताना हौशीने डॉक्टर व्हायचो.

माझे वडील वेस्टर्न इंडिया लाइफ इन्शुरन्स या तेव्हाच्या नामांकित विमा कंपनीमध्ये सातारच्या शाखेत कामाला होते. त्यांनी पुण्याच्या फर्ग्युसन कॉलेजातून गणितात एमए केले होते. ॲक्च्युरीअल सायन्स म्हणजे एखाद्या व्यवहारातील जोखीम गणिती पद्धतीने मोजण्याचे शास्त्र. त्यासाठी विश्लेषक पद्धतीचे गणित लागते. अलीकडे या शास्त्राचा मोठाच बोलबाला आहे. पण वडिलांनी त्या काळात ॲक्च्युरीअल सायन्सच्या पाच परीक्षा पास केल्या होत्या.

माझा जन्म सातारचा. २५ ऑक्टोबर १९३२. आम्ही सख्खी एकूण सात भावंडे. पाच भाऊ आणि दोन बहिणी. सगळ्यात मोठा अरविंद त्याला बंडू म्हणत. त्याच्या मागचा प्रभाकर किंवा बाळ. बाळच्या पाठचा मी. मग शालू आणि मालू या दोघी बहिणी. श्रीकृष्ण - त्याला नंदू म्हणत, आणि अरुण हे दोघे भाऊ सगळ्यात धाकटे. आणखी यशवंत, वसंत आणि दत्ता हे आमचे मावसभाऊ आमच्यातच वाढले.

माझी मावसबहीण मालतीही आमच्याचकडे असे. एकदा पूजेसाठी निरांजन आणताना ती भाजली. माझ्या मोठ्या भावाने तिला घोंगडीत लपेटले, पण ती बरीच भाजली होती. तिला हॉस्पिटलमध्ये नेले, पण दोन-तीन दिवसांतच ती गेली. या घटनेचा माझ्यावर खूप खोल परिणाम झाला. ती का वाचली नाही? मी पुढे डॉक्टर झाल्यावर केईएममध्ये जेव्हा जेव्हा भाजलेल्या पेशंटवर उपचार करावे लागायचे, त्या दर वेळी मला ही लहानपणाची घटना आठवायची आणि डोळ्यांत पाणी जमा व्हायचे.

सातारला खेळताना एकदा मला उजव्या पायाला लागले. मी पाच-सहा वर्षांचा असेन. जखम चिघळली. त्याला कसलातरी पाला लावून यशवंतदादा मला ड्रेसिंगला न्यायचा. जखम बरी होण्यास खूप दिवस लागले आणि त्याचा मोठा डाग माझ्या उजव्या पायावर कायमचाच राहिला. यशवंताच्या कडेवर बसून अनेकदा गेल्याचे मला आठवते. ही आठवणसुद्धा कायमची खोलवर रुजून बसली आहे. पुढे मी पेशंटचे ड्रेसिंग करताना मला लहानपणची ही आठवण येई.

मी सहा वर्षांचा असताना वडिलांची पुण्याच्या शाखेचे मॅनेजर म्हणून बदली झाली. त्यामुळे मला लहानपणीच्या सातारच्या फार आठवणी नाहीत. तेथे आमच्या घरासमोरच एक शाळा होती आणि त्या ठिकाणी आम्हाला खाली

भाग दोन

# युरोलॉजिस्ट म्हणून वाटचाल



दहा

# इंग्लंडमधील अनुभव

आमचा वर्गमित्र डॉ. ह. वि. सरदेसाई त्याच सुमारास विमानाने इंग्लंडला गेला होता. आम्ही खाऊनपिऊन सुखी होतो, पण विमानाचे तिकीट काढण्याएवढी आमची घरची परिस्थिती नव्हती. मी काही ट्रॅव्हल एजंट मंडळींशी बोललो आणि मला 'एस. एस. स्ट्रॅथमोर' या बोटीचे तिकीट किफायतशीर भावात मिळाले. मी या बोटीने १९ मार्च १९६० रोजी इंग्लंडला प्रयाण केले आणि ६ एप्रिलला मी लंडनला पोचलो. संपूर्ण प्रवासाचे तिकीट ८७२ रुपये होते.

प्रवास पूर्ण १९ दिवसांचा होता, परंतु तो अतिशय आनंदाचा झाला. मला अनेक गोष्टी शिकायलाही मिळाल्या. एस. एस. स्ट्रॅथमोर ही 'पी अँड ओ' (पेनिन्सुलार अँड ओरिएंटल स्टीम नेव्हिगेशन) या नावाजलेल्या ब्रिटिश कंपनीची बोट होती. त्यामुळे बोटीवरचे सर्व दैनंदिन व्यवहार आणि शिष्टाचार यांवर ब्रिटिश परंपरांचा पगडा होता. मी प्रथमच इंग्लंडला चाललो होतो. या बोटीवरच्या प्रवासात ब्रिटिश जीवनपद्धतीशी जुळवून घेण्याची रंगीत तालीमच मला मिळाली. बीबीसीचा निष्ठावान श्रोता असल्यामुळे मला ब्रिटिश उच्चारांच्या बाबत अडचण नव्हती.

ती १९ हजार टन वजनाची प्रचंड बोट होती. एकूण दोन हजारांहून अधिक प्रवासी त्यातून प्रवास करत होते. ते एक तरंगते नगरच होते. मला मिळालेली केबिन समुद्राच्या पाण्याच्या पातळीच्या खालच्या भागात होती. त्यात एकूण चार बर्थ होते. संडास-बाथरूमची सोय सामायिक होती. मी पुष्कळ वेळा डेकवर फिरायचो. मोठ्या बोटींमध्ये लांबच्या प्रवासात प्रवाशांचे मन रमवण्यासाठी अनेक गोष्टी असतात. तशी तेथे सिनेमाची थिएटर्स, टेबल टेनिसचे कोर्ट अशा गोष्टी होत्या. आता त्यापैकी अधिक काही आठवत नाही, पण मी सगळ्या गोष्टींत भाग घ्यायचो. बोटीवरची जेवणाची व्यवस्था चांगली

होती. शाकाहारी लोकांचे वेगळे टेबल असायचे.

वाटेत बोट चार-पाच ठिकाणी थांबली होती. आधी एडनला थांबली. प्रसिद्ध सुवेझ कॅनलमार्गे पुढे गेली. सायप्रस लागल्याचे आठवते, परंतु सायप्रसला बोट थांबली नव्हती. नंतर फ्रान्सला मार्सेलिस बंदर करून इंग्लिश कॅनलमध्ये दाखल झाली. बोटीवरून मी घरी फारशी पत्र पाठवल्याचे आठवत नाही. परंतु इंग्लंडवरून दर आठवड्याला ठाण्याला विमलला आणि सातारला आई-वडिलांना नियमित पत्रे लिहीत असे. त्यांचीही यायची.

तेथे दामोदर करंदीकर हा माझा मामेभाऊ मला घ्यायला आला होता. तो तेथे बँक ऑफ इंडियाच्या लंडनच्या शाखेमध्ये मुख्य लेखापाल (चीफ अकौन्टन्ट) म्हणून काम करत होता. गोल्डर्स ग्रीन नावाच्या उपनगरात तो एक भाड्याची खोली घेऊन राहत होता. या व्यवस्थेला 'डिग्ज' म्हणत. तेथील ब्रिटिश यजमानीण रात्रीच्या निवाऱ्यासोबत सकाळच्या नाश्त्याची सोय ('बेड आणि ब्रेकफास्ट') करीत असे. प्रथमच इंग्लंडला येणाऱ्यांसाठी ही चांगली सोय होती.

अशी 'बेड आणि ब्रेकफास्ट'ची सोय मिळवणे ही फारशी सोपी गोष्ट नव्हती. अनेकदा खोली भाड्याने द्यायची आहे अशी जाहिरात वाचून चौकशी केली, की प्रत्यक्षात सौम्य आणि सभ्य शब्दांत नकारच ऐकायला मिळे. मला आधी या गोष्टीचे वाईट वाटायचे. भारतीय माणसांच्या बाबतीत हा भेदभाव केला जातोय की काय असे मला वाटायचे. परंतु लवकरच माझ्या लक्षात आले की घरमालकिणी त्यांच्या आधीच्या अनुभवावरून आपली मते ठरवतात. आधी राहणाऱ्या व्यक्तीबाबत त्यांना अप्रिय अनुभव आला असेल, तर त्याच्या देशातून येणारा दुसरा माणूस त्याच्यापेक्षा वेगळा निघेल असे त्यांना का वाटावे.

इंग्लंडला गेल्यानंतर थोड्याच काळात मला जाणीव झाली की भाडेकरू म्हणून राहताना आपण काही नियम आणि शिष्टाचार पाळायला हवेत. त्यामुळे आपला चांगला ठसा उमटेल आणि आपल्यामागून तेथे खोली मागायला येणाऱ्याच्या पदरात नकार पडणार नाही. आपण जेव्हा परदेशामध्ये राहतो, तेव्हा एका दृष्टीने आपल्या देशाचे प्रतिनिधी म्हणून वावरत असतो. आपली वागणूक त्या दृष्टीने योग्य आणि सभ्य असायला हवी. ब्रिटिश लोक मुळात वाईट नाहीत. पण तुम्ही आधीच्या माणसापेक्षा वेगळे आहात हे त्यांना कसे कळावे.

भारतात असताना डॉ. करंजावालांनी माझी ओळख मिस्टर ॲलेक बेडेनॉक यांच्याशी करून दिली होती. मिस्टर बेडेनॉक (इंग्लंडमध्ये सर्व सर्जन्ससाठी

भाग तीन

# वाटचालीतील सोबती



अठरा

# घरातील कर्तबगार स्त्रिया

आमच्या आजोबांचे स्त्री-शिक्षणाविषयीचे विचार प्रागतिक स्वरूपाचे होते. अण्णांच्या कुटुंबात त्यांच्या धाकट्या बहिणी पिलाक्का (सौ. शिंत्रे) आणि गीता (सौ. आपटे) त्याचप्रमाणे, त्यांची भावजय रमा या तिघी स्त्रिया सुशिक्षित आणि कमावत्या होत्या. मामीचे स्वत:चे औपचारिक शिक्षण फार झालेले नसले, तरी आमच्या घरातील सर्वांत बुद्धिमान व्यक्ती तीच होती. शालिनी (सौ. भोगले) आणि मालिनी (सौ. कुलकर्णी) या माझ्या दोन्ही बहिणीदेखील पोस्ट ग्रॅज्युएशनपर्यंत शिकल्या आणि आपल्या पायांवर उभ्या राहिल्या. आमच्या घरातील या सर्व कर्तबगार स्त्रियांचा माझ्या मनावर फार चांगला संस्कार झाला. त्या जितक्या सौम्य, तितक्याच कणखरही होत्या. मला घडवण्यामध्ये माझ्या आयुष्यातील सर्व स्त्रियांचा मोठा वाटा आहे.

त्यामध्ये माझी पत्नी डॉ. विमल आणि आमच्या चार मुलींचाही समावेश आहे. आमचे घर तर पूर्णपणे स्त्रीप्रधान आणि स्त्री-सत्ताक आहे असे म्हणायला हरकत नाही आणि ही व्यवस्था माझ्या फायद्यातच पडलेली आहे असे मला वाटते. माझे जीवन त्यांच्यामुळे सुंदर झाले. इतकेच नव्हे, तर माझ्या व्यावसायिक यशातदेखील त्यांचा मोलाचा सहभाग आहे. त्यांच्या या सहभागाची जाणीव ठेवणे आवश्यक आहे.

**डॉ. सौ. विमल बापट (गोखले) - सर्वार्थाने माझी पार्टनर**

विमल गोखलेशी माझी ओळख झाली, तेव्हाही ती अगदी घरगुती वळणातली आणि अभ्यासू मुलगी वाटायची. नेहमी साड्याच नेसायची. तिचे घर ठाण्याला होते. रोजची सकाळी साडेआठपासून संध्याकाळी पाचपर्यंत आमची लेक्चर्स असायची. त्यातून ती ठाण्याहून कॉलेजला ये-जा करायची. खेळांमध्ये

किंवा कॉलेजच्या इतर कुठल्या उपक्रमांमध्ये भाग घ्यायला तिच्याकडे वेळच नसायचा. कॉलेजच्या लेडीज हॉस्टेलमध्ये राहायला लागल्यावर तिच्यामध्ये थोडा-फार फरक पडला. आमच्या कॉलेज डेच्या कार्यक्रमात तिचे गाणे नेहमी असायचे. तिचा आवाज गोड होता. एका कार्यक्रमात तिने 'माझा होशील का' हे त्या वेळचे प्रसिद्ध प्रेमगीत गायले होते. त्यानंतर आमच्या हॉस्टेलजवळून जाताना 'माझा होशील का'... 'माझा होशील का'... असे पालुपद ऐकवून मुलांनी तिला हैराण केले होते.

विमल माझी जवळची मैत्रीण होती. आमचे लग्न ९ फेब्रुवारी १९५७ रोजी झाले. त्या वेळी आम्ही दोघेही रेसिडेंट पोस्ट करत होतो. लग्न झाले त्या काळात आमच्याकडे मुंबईत राहण्यासाठी स्वत:ची जागा नव्हती. आम्ही आपापल्या कामाच्या ठिकाणी स्वतंत्र राहत होतो आणि एकमेकांना भेटायला जात होतो. विमलने ओबी-जीवायएन या तिच्या विषयात एमडीसाठी मुंबई विद्यापीठात रजिस्टर केले होते. त्याच वेळी मी जनरल सर्जरीमध्ये एमएससाठी रजिस्टर केलेले होते. आम्ही दोघेही पार्ट वनची परीक्षा एकाच वेळी उत्तीर्ण झालो.

१९५८मध्ये कधीतरी मी पार्ट टूच्या परीक्षेला बसलो. माझ्या दृष्टीने परीक्षा आरामात पार पडली. विमलच्या बाबतीत मात्र दरम्यानच्या काळात तिचे प्राधान्यक्रम पार बदलून गेले होते. १३ डिसेंबर १९५७ रोजी आमच्या पहिल्या मुलीचा, वासंतीचा जन्म झाला. पार्ट टूची परीक्षा देण्याच्या बाबतीत विमलच्या मनाची तयारी होईना. खरे तर तिला परीक्षेला बसता यावे यासाठी आवश्यक त्या सर्व बाबींची पूर्तता झाली होती. तिला प्रत्यक्ष अनुभवदेखील भरपूर होता. विमल आधी केईएमला गायनॅक विभागात होती आणि नंतर वाडिया मॅटर्निटीमध्ये रेसिडेंट अकोचर म्हणून होती. तिने वर्षभरासाठी केईएम हॉस्पिटलमध्ये कॅज्युअल्टी अधिकारी आणि त्यानंतर राजावाडी मॅटर्निटी हॉस्पिटलमध्ये वैद्यकीय अधिकारी म्हणून काम केले होते. तिचा अनुभव आणि ज्ञान या दोन्ही गोष्टी लक्षात घेता तिने परीक्षा अगदी सहज दिली असती. जे परीक्षक होते, त्यांनीही तिला हीच गोष्ट सांगितली. परंतु तिची समजूत काही पटली नाही.

आमचे कौटुंबिक जीवन थोडे लवकर सुरू झाले. तरीदेखील मुलीला घरी ठेवून, स्वतंत्र अभ्यास करून परीक्षा देणे तिच्यासाठी अशक्य नव्हते. अनेक स्त्रिया तसे करतात. मीदेखील त्या वेळी तिला ही गोष्ट पटवून देण्यात कमी पडलो. परंतु विमलच्या स्वभावाला अनेक कंगोरे होते. प्रत्येक गोष्ट

भाग चार

# शैक्षणिक आणि संस्थात्मक कार्य



वीस

# शिकवण्यातील आनंद आणि नडियाद

शिकवण्याची आवड बहुतेक माझ्या गुणसूत्रांमध्येच असावी. माझे वडील उत्तम शिक्षक होते आणि त्यांचे विद्यार्थी त्यांना फार मानत असत. कठीण संकल्पनांची उकल सोप्या पद्धतीने करून दाखवण्यात त्यांचा हातखंडा होता. चांगल्या शिक्षकाकडून हीच अपेक्षा असते. शिकवण्याच्या कृतीमधून ज्ञानाचे खऱ्या अर्थाने हस्तांतरण झाले पाहिजे. ज्याला शिकवायचे आहे त्याला ते व्यवस्थित समजले पाहिजे आणि त्याच्या हृदयात ते कायमचे साठवले गेले पाहिजे. त्यासाठी मुळात शिक्षकाला त्या विषयाचे पुरेसे ज्ञान हवे; आणि त्या विषयात नवीन काही घडत असेल तर ते जाणून घेण्याची जिज्ञासा हवी. कारण उपलब्ध ज्ञान काळाबरोबर सतत वाढत जाते.

विशेषत: वैद्यकशास्त्र आणि त्याच्या संलग्न शाखांना ही गोष्ट अधिकच लागू पडते. या क्षेत्रात सतत शिकत राहावे लागते. अनेकदा आधी शिकलेल्या गोष्टी डोक्यातून पूर्णपणे काढून टाकून, काही गोष्टी पूर्णपणे नव्याने शिकून घ्याव्या लागतात. ही प्रक्रिया निरंतर चालू असते. आज आपण जे काही शिकवत असू ते कदाचित काही वर्षांनंतर कालबाह्य झालेले असेल. अर्थात, शास्त्रातील मूलतत्त्वांचा अपवाद करून, कारण ती तत्त्वे कुठल्याही काळात सारखीच राहतात.

किती खोलात जाऊन शिकवायचे त्याची पातळी काही वेळा बदलू शकते. उदाहरणार्थ, परीक्षेसाठी विद्यार्थ्यांची तयारी करून घ्यायची तर त्या दृष्टीने शिकवावे लागते. परीक्षा आवश्यक असते, कारण ॲनाटोमी, फिजिओलॉजी आणि फार्माकॉलॉजी अशा विषयांची मूलतत्त्वे तुम्हाला नीट कळली पाहिजेत. परीक्षेत तुम्ही किती उत्तम बोलू आणि लिहू शकता, त्यावर तुमचे मूल्यमापन केले जाते. परंतु शिक्षकाने आजवर मिळवलेले ज्ञान या हृदयातून त्या हृदयी

पोचवायचे असेल, तेव्हा त्या त्या वैद्यकीय शाखेच्या सगळ्या बाजू नीट उलगडून दाखवता आल्या पाहिजेत. तेथे केवळ परीक्षेच्या दृष्टीने विचार करून भागणार नाही. त्यासाठी शिक्षकाला केवळ आपला विषय अवगत असून पुरेसा नाही, तर शिक्षकाला भाषादेखील वश असली पाहिजे. कारण भाषा ही त्या ज्ञानाची वाहक आहे. शिक्षकाच्या शिकवण्याच्या शैलीवरून विद्यार्थीदेखील त्यांची क्षमता ठरवत असतो.

कुठल्याही शिक्षकावर त्याच्या आधीच्या पिढीतील शिक्षकांचा मोठा प्रभाव असतो. माझ्यावर आमचे सर्जरीचे प्राध्यापक डॉ. ए. व्हि. बाळिगा यांचा ठळक प्रभाव पडलेला होता. त्यांची शिकवण्याची पद्धत फार छान होती. पेशंटला तपासल्यावर प्रत्येक डॉक्टर आपल्या पद्धतीने त्याच्या समस्येचे निदान करतो. परंतु एकच एक छातीठोक निदान करणे कठीण असते. अशा वेळी आमच्या वैद्यकीय भाषेत डिफरन्शियल डायग्नोसिस करण्याचा पर्याय असतो. याचा अर्थ तुमच्यासमोर असलेल्या परिस्थितीत दोन-तीन प्रमुख अंदाज बांधता येतात आणि त्यापलीकडे एखादी दुर्मीळ केस असण्याची शक्यतादेखील नाकारता येत नाही.

डॉ. बाळिगा काय करायचे, तर त्या दोन किंवा तीन संभाव्य शक्यतांच्या खाली एक रेघ ओढायचे. मग त्या रेघेच्या खाली ती दुर्मीळ शक्यतादेखील मांडून ठेवायचे. मला ही पद्धत अतिशय उपयुक्त वाटली. माझ्या विद्यार्थ्यांना शिकवतानाच नव्हे, तर प्रत्यक्ष माझ्या प्रॅक्टिसमध्येही अशा पद्धतीने विचार करण्याचा मला फायदाच झाला. त्यामुळे कुठलीच शक्यता तुमच्या विचारांच्या परिघातून निसटत नाही.

सुरुवातीच्या काळात शिकवण्याचे काम माझ्यासाठी सहज होते. मी जे शिकलेलो होतो आणि जे अवतीभवती सतत शिकत होतो, तेच मला शिकवायचे होते. एमबीबीएस आणि एमएससाठी परीक्षा देणाऱ्या आणि नंतर युरोलॉजीमध्ये स्पेशलायझेशन करणाऱ्या विद्यार्थ्यांना मी मुख्यत्वे शिकवले. माझा उद्देश नेहमी हा असायचा की मी जे शिकवतोय ते या विद्यार्थ्याला रोजच्या रोज वापरता आले पाहिजे. तेवढेच नाही, तर त्याच्या मनात ते कायमचे ठसले पाहिजे. नंतर ज्या वेळी तो पेशंट तपासत असेल आणि रोगनिदान करीत असेल, त्या वेळी ही गोष्ट त्याला अचूक आठवली पाहिजे.

एमएसची परीक्षा झाल्यानंतर एक जनरल सर्जन म्हणून मी जेव्हा माझ्या कामाला सुरुवात केली, त्या वेळी लवकरच मला कळून चुकले की तोवर पुस्तकातून मी जे काही शिकलो होतो, ते फार वर-वरचे ज्ञान होते आणि ते